Yashoda Shikshan Prasarak Mandal's
YASHODA TECHNICAL CAMPUS, SATARA
NH-4, Wadhe Phata, Satara., Tele - 02162-271238/39/40
Website- https://www.yes.edu.in,,Email-registrar_ytc@yes.edu.in
Approved by PCI- New Delhi, Govt. of Maharashtra (DTE, Mumbai)
Affiliated to D Batu University, Lonere , Shivaji University, Kolhapur
MSBTE, Mumbai. Mobile No:- 9172220775
NAAC B+

**Prof. Dasharath Sagare**
**Founder, President**

**Dr. G. K. Suravase**
**Registrar**

Ref. No.:-YSPM/YCP/ ADMIN/ 137 /2026-27

**Date:- 23/ 09 / 2026**

# नोटीस

यशोदा इन्स्टिट्यूट मधील सर्व **नवीन शैक्षणिक वर्ष २०२६–२७ प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना** कळविण्यात येते की, जे विद्यार्थी भटक्या जाती व जमाती फक्त धनगर समाजाजील प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश मिळाला नाही व भाडयाने राहत असलेल्या **"स्वंयम"** योजना शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, सदर योजनेसाठी https://testhms.mahaitgov.in/ या संकेतस्थळावर **ऑनलाईन** पध्दतीत शिष्यवृत्तीचा अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण समाजकल्याण, विभाग सातारा यांच्याकडून नवीन अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ १५/०९/२०२६ हि अंतीम मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु संकंतस्थळावर वारंवर तांत्रिक अडचणीमुळे येत असल्याने नविन विद्यार्थ्यींना नविन वेळापत्रक देण्यात आली आहे. **विद्यार्थ्यींनी ऑनलाईन अर्ज दि. ३०/०९/२०२६ पर्यंत मुदतवाढ मध्ये भरावयाचे आहेत,** तरी पात्र इच्छुक विद्यार्थ्यांनी तात्काळ आपले वस्तीगृह शिष्यवृत्तीचे अर्ज भरून योग्य कागदपत्रासह महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागाकडे जमा करावेत. जे विद्यार्थी वेळेत अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

टिप – "स्वंयम" योजनेकरता ऑनलाईन पद्धतीने शासकीय वसतीगृह प्रथम अर्ज करणे बंधनकारक आहे.

१) GR माहीतीसाठी जोडत आहे.

२) संकेतस्थळ – https://testhms.mahaitgov.in/

३) कागदपत्रक चेकलिस्ट

Yashoda Technical Campus 6757 Satara

Registrar
Yashoda Technical Campus
Satara

वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या
धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना आदिवासी
विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या
धर्तीवर स्वतंत्र योजना सुरु करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग विमुक्त जाती भटक्या जमाती,**
**विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्र. धवगृ- २०१९/प्र.क्र.१२६/मावक,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०६ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८

२) शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.१२१/मावक, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१९.

प्रस्तावना:-

मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविणेबाबत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास अनुलक्षून दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या मा. मंत्रिमडळाच्या बैठकीत आदिवासींच्या धर्तीवर १३ योजना धनगर समाजासाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार दिनांक ०७/०८/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविणेबाबत वाचा येथील दिनांक २७ नोव्हेंबर,२०१८ च्या आदिवासी विकास विभागाने कार्यान्वयीत केलेली पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेप्रमाणेच, धनगर समाजातील विद्यार्थी जे वसतिगृहातील प्रवेशापासून वंचित आहेत त्या विद्यार्थ्यांना सदर योजना सुरू करण्याबाबतची बाब विचाराधीन आहे.

आदिवासी विकास विभागाच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजनेमध्ये विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत तरतूद केलेली आहे. सदर योजनेंतर्गत महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निवास भत्ता तसेच शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्याकरिता निर्धारित केलेले अर्थसहाय्य देण्यात येते. भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये, यासाठी आदिवासी विकास विभागाप्रमाणे धनगर समाजातील विद्यार्थ्यांना दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -:**

महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरीय शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेत असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १२ वी नंतरच्या मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या धनगर समाजातील विद्यार्थ्यांना "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना" या योजनेंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२ सदर योजना महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या धनगर समाजातील विद्यार्थ्यांना मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या शासकीय तसेच अनुदानित महाविद्यालयांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेऊन शिक्षण घेणाऱ्या धनगर समाजातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

३ सदर योजनेंतर्गत शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेणे किंवा थेट अनुज्ञेय रक्कमेचा लाभ घेणे हे दोन पर्याय विद्यार्थ्यांकडे उपलब्ध राहणार आहेत.

४ खालील प्रकारच्या क्षेत्रनिहाय शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या परंतू शासकीय वसतिगृहात प्रवेशित नसलेल्या धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेण्याकरिता वार्षिक खर्चासाठी खालीलप्रमाणे निश्चित केल्यानुसार विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरित करण्यात यावी.

| **अ.क्र** | **खर्चाची बाब** | **मुंबईशहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर याठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम** | **इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम** | **इतर जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० |
| २ | निवास भत्ता | २०,००० | १५,००० | १२,००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,००० | ८,००० | ६,००० |
| ४ | प्रती विद्यार्थी एकूण संभाव्य वार्षिक खर्च | ६०,००० | ५१,००० | ४३,००० |
| ५ | प्रतिवर्ष महत्तम विद्यार्थी संख्या | ७,००० | ९,००० | १०,००० |

## ५. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालीलप्रमाणे निकष असतील.

### अ) मुलभूत पात्रता

i. विद्यार्थी धनगर समाजातील असावा. विद्यार्थ्यांने अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

ii. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु. २.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या-ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

iii. विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संल्लग्न करणे बंधनकारक राहील.

iv. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा.

### ब) शैक्षणिक निकष

i. सदरचा विद्यार्थी इयत्ता १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

ii. इयत्ता १२ वी मध्ये किमान ६०% गुण मिळालेले विद्यार्थी या योजनेस पात्र राहतील.

iii. केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही.

iv. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

v. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इत्यादी मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात / संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.

vi. योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्याने इयत्ता १२ वी नंतरच्या मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेला असावा.

vii. योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्याची महाविद्यालयीन उपस्थिती ६०% असणे बंधनकारक राहील. तथापि, एखाद्या विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शंका निर्माण झाल्यास संबंधित महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शहानिशा करून विद्यार्थ्यास देय असलेली रक्कम अदा करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

viii. विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

ix. निवड करण्यात आलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या-त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

## क) इतर निकष

i. एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ५ वर्षे सदर योजनेचा लाभ घेता येईल.

ii. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय २८ वर्षापेक्षा अधिक नसावे.

iii. अभ्यासक्रमाच्या मध्यावधी प्रवेश घेतलेला विद्यार्थी योजनेंतर्गत लाभास पात्र असेल.

iv. शिक्षणात खंड पडलेला विद्यार्थी सदर योजनेंतर्गत लाभास पात्र असेल. तथापि, सदर विद्यार्थी योजनेंतर्गत निश्चित केलेल्या वयोमर्यादेपेक्षा अधिक वयाचा नसावा.

v. सदर योजनेस पात्र विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास, अनुत्तीर्ण कालावधीमध्ये योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार नाही. उत्तीर्ण झाल्यानंतर असा विद्यार्थी लाभास पुढे पात्र राहील. तथापि, उपरोक्त ७ वर्षाचा कालावधी विचारात घेताना उत्तीर्ण व अनुत्तीर्ण अशा दोन्ही कालावधींची गणना करण्यात येईल.

vi. योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या महाडिबीटी मध्ये ज्यांनी अर्ज केला आहे व त्यांचा अर्ज मंजूर झाला आहे त्यांना अनुज्ञेय राहील वसतिगृह प्रवेश प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

vii. विद्यार्थ्यास आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहामध्ये प्रवेश मिळालेला नसावा.

viii. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.

ix. धनगर समाजातील अपंग विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ प्राथम्याने देय राहील.

x. विद्यार्थी व शैक्षणिक संस्थांनी सदर योजनेचा लाभ घेताना शासनाची फसवणूक केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच योजने अंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न करता लाभ घेणे, शिक्षण न घेता नोकरी / व्यवसाय करुन या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यावर देखील असा विद्यार्थी कारवाईस पात्र राहील व दिलेल्या रक्कमेची १८% दंडनीय व्याजासह वसुली करण्यात येईल.

xi. सदर योजनेंतर्गत निवड होणाऱ्या विद्यार्थ्यास आहार व निवास सुविधा मोफत उपलब्ध करण्यात येत असल्याने भारत सरकार पोस्टमॅट्रीक शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अशा विद्यार्थ्यास निर्वाह भत्ता १/३ या दराने अनुज्ञेय राहील. त्यानुसार अशा पात्र विद्यार्थ्यास केंद्र शासनाचा अनुज्ञेय १/३ निर्वाहभत्ता प्रथम देण्यात येईल व या योजनेतंर्गत प्रस्तावित निर्वाहभत्त्याची रक्कम व केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय १/३ निर्वाहभत्ता यामधील तफावतीची रक्कम राज्य शासनाच्या या योजनेमधून निर्वाहभत्ता बाबी अंतर्गत देण्यात यावी.

**६ सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अनुदान वितरण करण्यात यावे :-**

i. योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली भोजन, निवास व निर्वाहभत्त्याची तीन महिन्याची एकत्रित रक्कम पात्र लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात संचालक स्तरावरील मध्यवर्ती खात्या- मधून आगाऊ जमा करण्यात यावी.

ii. प्रस्तुत योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यास एका शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांच्या कालावधीसाठी लाभ अनुज्ञेय राहील. सदर १० महिन्यांचा लाभ निश्चित करण्याची जबाबदारी संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, पुणे यांची राहील. तथापि, लाभाची रक्कम जमा करताना प्रत्येक तिमाहीमध्ये देय असलेली रक्कम जमा करावी.

iii. संबंधित विद्यार्थ्याने व शैक्षणिक संस्थेने महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे अर्ज करणे अनिवार्य राहील. त्याच प्रमाणे महाडिबीटी पोर्टलवर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यापैकी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरलेले विद्यार्थीच या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतील.

iv. योजनेंतर्गत विद्यार्थ्याने अर्ज केल्यानंतर सदर अर्जाची तसेच तद्नुषंगिक कागदपत्रांची तपासणी/पडताळणी करून संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खालील गठीत समिती Online पध्दतीने प्राप्त अर्जास अंतिम मंजूरी देईल.

७ प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूरीबाबत व पुढील निर्णय घेण्यासाठी खालील प्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी /अति. जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी /अति. मुख्य कार्यकारी अधिकारी | - | सदस्य |
| ३) | आदिवासी विकास विभागाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ४) | प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण | - | सदस्य |
| ५) | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा प्रतिनिधी | - | सदस्य |
| ६) | शिक्षण अधिकारी (संबंधित), | - | सदस्य |
| ६) | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (संबंधित) | - | सदस्य सचिव |

जिल्हाधिकारी हे निमंत्रक म्हणून ज्या अधिकाऱ्यांची आवश्यकता असेल त्यांना बोलावू शकतील. तसेच योजनेच्या अंमलबजावणी बाबत निर्णय घेतील.

८ जिल्हास्तरीय समितीने मान्यता प्रदान केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने पात्र लाभार्थ्यांचे अर्ज संबंधीत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी संचालक, पुणे यांच्याकडे विद्यार्थ्यांना अनुदान वितरणासाठी Forward करावेत. संचालक, पुणे यांनी तात्काळ पात्र विद्यार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

९ सन २०१९ च्या जुलै, महिन्यातील अतिरीक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात धनगर समाज बांधंवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याकरीता २२२५ E९३७ या लेखाशिर्षाखाली

रु. २५०.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यामुळे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या अंमलबजाणीसाठी होणारा खर्च २२२५ E९३७ या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्यात यावा, दरम्यानच्या कालावधीत सदर योजनेसाठी नवीन लेखाशिर्ष घेऊन १ एप्रिल, २०२० ते ३१ मार्च, २०२१ या तसेच तद्नंतरच्या पुढील प्रत्येक वित्तीय वर्षात होणारा खर्च नवीन लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

१० सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५००/२०१९/व्यय-१४, दिनांक २७.०८.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन तसेच नियोजन विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

११ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०९०६१५२१३२६०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( रविंद्र गुरव )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा / विधान परिषद, विधानमंडळ, सचिवालय, मुंबई.
६. सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
९. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५. प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई.
१६. कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१८. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचलनालय, पुणे.
१९. सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,
२०.सर्व प्रादेशिक उपायुक्त. समाज कल्याण.
२१. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२३.निवड नस्ती (मावक), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई.

**वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना स्वयम योजनेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

**सन- 2025-26**

| |
|---|
| अर्जदाराचा<br>रंगीत फोटो |

आवेदनपत्र भरण्यापुर्वी ते काळजीपूर्वक वाचून भरावे

| कार्यालयाने भरावयाची माहिती | | | |
|---|---|---|---|
| आवेदनपत्र आवक क्रमांक | गुणवत्ता यादीतील क्रमांक | गुण | टक्केवारी |
| | | एकूण गुण :-<br>प्राप्त गुण :- | |

प्रति,

मा.सहाय्यक संचालक,

इतर मागास बहुजन कल्याण, सातारा

महोदय,

मी शासकिय वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता सुरु केलेल्या स्वयंम योजनेचा लाभ मिळण्यासाठी माझे आवेदनपत्र सादर करीत आहे. आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार खरी आहे. मी सदर योजनेच्या अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या असून त्या मला अवगत झाल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळाल्यास मी सदर योजनेसाठी लागू असलेल्या सर्व नियमांचे व अटींचे कसोशिने पालन करीन अशी मी हमी देत आहे.

सदर योजनेचा लाभ घेताना खोटी कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक केल्याचे आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास, शिक्षण न घेता नोकरी/व्यवसाय करून या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास मी कारवाईस पात्र राहील व सदर योजनेअंतर्गत मला मिळालेली रक्कम(18 टक्के) व्याजासह शासनास परत करेन.

आपला/आपली विश्वासू,

स्थळ :- (अर्जदाराची स्वाक्षरी)

दिनांक : नाव : ------------------------------------------

मोबाईल क्र ------------------------------------------

आधार क्र : ------------------------------------------

**वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना स्वयम योजना-अर्जाचा नमुना**

| | |
|---|---|
| **अर्जदाराची माहिती :-** | |
| अ) 1. अर्जदार विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :- --------------------------------------------------- | |
| 2. वडिलांचे पूर्ण नाव :- -------------------------------------------------- | |
| 3. अर्जदार विद्यार्थीनी विवाहीत असेल तर पतीचे नाव व पत्ता :- ---------------------- | |
| 4. आईचे पूर्ण नाव :- -------------------------------------------------- | |
| 5. जात व प्रवर्ग :- --------------------------------- | |
| 6. (i) अर्जदाराचे मूळ राहण्याचे ठिकाण व पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (पिनकोडसह) | घर क्रमांक : .............. रस्ता/गल्ली : ..................... <br> गाव/शहर : ................. तालुका : ............................ <br> जिल्हा : .................... पिन कोड : ........................ |
| (ii) उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी यांनी दिलेला रहिवासी दाखला | प्रमाणपत्राचा क्रमाक :......................... <br> दिनांक : .............................. <br> कार्यालयाचे नाव :....................................... |
| 7. अर्जदाराचा मोबाईल क्रमांक असल्यास दुरध्वनी क्रमांक (एसटीडी कोडसह) | मो:-.............................. <br> दुरध्वनी:................................. |
| 8. अर्जदार दिव्यांग आहे काय ? दिव्यांगत्वाचा प्रकार व टक्केवारी | .................................................... |
| **ब) जातीच्या दाखल्याचा तपशील :-** | |
| (i) अर्जदाराने ज्या जिल्हयातून जातीचा दाखला काढला आहे त्या जिल्हयाचे नाव | <br> प्रमाणपत्र क्र. ......... जारी केल्याचा दि. ................. <br> जात : ................ गाव : ................................ <br> तालुका : .............. जिल्हा : .................. |
| जात पडताळणी समितीने दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राचा तपशील | प्रमाणपत्र क्र. ................ दिनांक :- <br> जा.प्र.प.समितीचे नाव:-.................. |
| **क) आधार कार्डाचा तपशील :-** | |
| (i) अर्जदाराचा आधारकार्ड क्रमाक | |
| (ii) आधारकार्डवरील पत्ता | |
| **ड) बँकेचा तपशील :-** | |
| 1) राष्ट्रीयकृत/शेडयूल्ड बँकेचे नाव | |
| 2) शाखा | |
| 3) खाते क्रमांक | |
| 4) I.F.S.C. कोड | |
| 5) बँक खाते आधारकार्डाशी संलग्न केल्याचा पुरावा | |
| **इ) प्रवेशित महाविद्यालयाची माहिती :-** | |
| 1) प्रवेशीत महाविद्यालयाचे नाव | |
| 2) महाविद्यालयाचा पत्ता | |

| | |
|---|---|
| 3) महाविद्यालयातील प्रवेश नोदंणी क्रमांक/ ID क्र. | |
| **इ) प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती:-** | |
| 1) अभ्यासक्रमाचे नाव | |
| 2) प्रवेशित वर्ष (प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ/पाचवे) | |
| 3) प्रवेश दिनांक | |
| 4) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा) | |
| 5) अभ्यासक्रम =पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी | |

**ग) गुणांची टक्केवारी :-**

| | प्रवेशीत वर्ष | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| इयत्ता 12 वी | | | | | |
| पदवी | | | | | |

टिप : 1. गुणांच्या ऐवजी ग्रेडेशन असल्यास ग्रेडेशन नुसार येणारी टक्केवारी द्यावी.
2. जे लागू नसेल ते खोडावे.

| | |
|---|---|
| **ह)** (i) अर्जदाराने विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देय असणाऱ्या शिष्यवृत्ती/शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क योजनेचा लाभ घेतला आहे का ? | |
| (ii) घेतला असल्यास त्याचा युजर आय. डी. क्रमांक | |

**अर्जदाराच्या पालकांची माहिती :-**

| | |
|---|---|
| 1) पालकांचे पूर्ण नाव | |
| 2) पालकाचे अर्जदाराशी नाते | |
| 3) वडिल जिवीत नसल्यास त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्राची साक्षांकिंत प्रत जोडावी | |
| 4) पालकांचा व्यवसाय | |
| 5) जेथे व्यवसाय करतात तेथील पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| 6) पालकाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न. तहसिलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र | र.रुपये : |

मी दिलेली माहिती खोटी आढळल्यास किंवा माझ्या पाल्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास माझ्या पाल्याचा सदर योजनेचा मिळत असलेला लाभ रद्द होईल, याची तसेच अशाप्रकरणी माझ्या पाल्यास मिळालेली रक्कम 18 टक्के व्याजासह मी शासनास परत करीन अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ :-

दिनांक :-

साक्षीदार :-

नाव :- 1) -------------------------------- स्वाक्षरी-----------------------

2) -------------------------------- स्वाक्षरी----------------------

पालकाची स्वाक्षरी

**धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता असलेल्या योजनेच्या अर्जासाठी शैक्षणीक संस्थेने द्यावयाचीमाहिती**

| | |
|---|---|
| अ) 1. विद्यार्थ्याचे नाव | |
| 2. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणीक संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | |
| 3. महाविद्यालय कोणत्या विद्यापीठाशी संलग्न आहे | |
| 4. अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे त्या अभ्यासक्रमाचे नाव व त्याचा कालावधी | |
| 5. महाविद्यालयास सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक | |
| 6. महाविद्यालय व्यवस्थापनाचा प्रकार (शासकीय/शासन अनुदानित/खाजगी अनुदानित/ खाजगीविनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यीत/अभिमत इ.) | |
| 7. महाविद्यालयाचा इ-स्कॉलरशीपचा युजर आय.डी.क्रमांक | |
| 8. विद्यार्थ्याचा प्रवेश नोदंणी क्रमांक/जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक | |
| **ब) विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतची माहिती :-** | |
| (1) अभ्यासक्रमाचे नाव | |
| (2) प्रवेशित वर्ष (पहिले/दुसरे/तिसरे) | |
| (3) प्रवेश दिनांक | |
| (4) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| (5) प्रकार – (अनुदानित/विनाअनुदानित) | |
| (6) अभ्यासक्रम (पदवी/पदविका/पदव्युत्तर) (इतर असल्यास नोंद करावी.) | |
| (7) आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जदाराने सादर केलेल्या गुणपत्रिकेनुसार त्यास इयत्ता 12 वी/ पदवी परीक्षेत मिळालेले एकूण गुण व टक्केवारी | इयत्ता 12 वी चे गुण : ........... टक्केवारी : ..............<br>पदवीचे गुण : .................... टक्केवारी : |
| (9) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात आणखी कोणत्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर केलेला आहे. | |
| (10) अर्जदाराने आपल्या संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी ज्या शैक्षणीक संस्थेत शिक्षण घेतले होते त्याची माहिती | |
| (11) अर्जदाराने कोणत्या कोटयातून प्रवेश घेतला आहे. (मॅनेजमेंट कोटा, CAP, स्पॉन्सर्ड कोटा, मायनॉरिटी, FWS (Fee Waiver Scheme), इतर | |

स्थळ :-

दिनांक :-

प्राचार्य

स्वाक्षरी व शिक्का

**R.T.G.S. साठी विद्यार्थ्यांनी भरुन द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| 1. | विद्यार्थ्याचे नाव (खातेपुस्तकानुसार) | |
| 2. | बँकेचे नाव | |
| 3. | शाखेचे ठिकाण | |
| 4. | बँक खाते क्रमांक | |
| 5. | IFSC Code | |
| 6. | MICR Code | |
| सोबत :- बँकेच्या खातेपुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स अथवा रद्द केलेला स्वाक्षांकित धनादेश जोडावा. | | |

विद्यार्थ्याची सही

**स्वयम योजनेसाठी विद्यार्थ्याने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

| | |
|---|---|
| 1) विद्यार्थ्याचे पूर्ण नाव | |
| 2) शिकत असलेल्या महाविद्यालयाचे नाव | |
| 3) अभ्यासक्रम | |
| 4) पालकांचा व्यवसाय | |
| 5) कालावधी | |
| 6) सन 2023-24मधील प्रवेशित वर्ष | |
| 7) प्रवेश दिनांक | |
| 8) विद्यार्थ्याचा मुळ पत्ता | |
| 9) सध्याचा स्थानिक रहिवास पत्ता | |
| 10) दुरध्वनी क्रमांक | |
| 11) मोबाईल क्रमांक | |
| 12) ई-मेल | |
| 13) पालकाचे नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक | |

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, वरिलप्रमाणे दिलेली माहिती सत्य असून सन 2024-25 मध्ये स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी मी असे शपथपूर्वक नमूद करतो/करते की, महाविद्यालयीन शिक्षण घेण्याकरिता सध्या मी आई-वडिल तसेच नातेवाईक यांच्यासोबत राहत नाही. असे आढळून आल्यास मला सदर योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम मी 18 टक्के व्याजासह शासनास परत करीन व होणाऱ्या कार्यवाहीस मी जबाबदार असेन.

(स्वाक्षरी)

विद्यार्थ्याचे नाव :- ---------------------------------------

साक्षीदार :-

नाव :- 1) ------------------------------------------------------------------------------- स्वाक्षरी :-

2) -------------------------------------------------------------------------------- स्वाक्षरी :-

**स्वयम योजनेच्या अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या सांक्षांकीत प्रती जोडाव्यात (मुळ प्रमाणपत्रे जोडू नये)**

| | | |
|---|---|---|
| 1 | जातीचा दाखला | आहे/नाही |
| 2 | जात वैधता प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 3 | कॅप राऊंड लेटर | आहे/नाही |
| 4 | महाराष्टाचा रहिवासी असल्याचा पुरावा ( वय /अधिवास व राष्ट्रीयव्त प्रमाणपत्र/ रेशन कार्ड प्रत) | आहे/नाही |
| 5 | आधार कार्डाची प्रत | आहे/नाही |
| 6 | बँकेत खाते उघडल्याचा पुरावा म्हणून पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत किंवा बँक स्टेटमेंटची प्रत किंवा रदद केलेला चेक. | आहे/नाही |
| 7 | तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 8 | विदयार्थीनी विवाहीत असल्यास पतीच्या उत्पन्नाचा पुरावा | आहे/नाही |
| 9 | विदयार्थी दिव्यांग असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 10 | इयत्ता 12 वी परिक्षेचे गुणपत्रक | आहे/नाही |
| 11 | महाविदयालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट | आहे/नाही |
| 12 | बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा | आहे/नाही |
| 13 | विदयार्थ्याने कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र | आहे/नाही |
| 14 | स्थानिक रहिवासी नसलेबाबतचे प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 15 | विदयार्थी सध्या जेथे राहतो त्याबाबतचा पुरावा (खाजगी वसतिगृह, भाडे करारनामा इ.) | आहे/नाही |
| 16 | महाविदयालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 17 | सत्र परिक्षेच्या निकालाची प्रत | आहे/नाही |

# आधार व स्वयंम योजना २०२५-२६ कागदपत्र चेकलिस्ट

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | विदयार्थ्याचा ऑनलाईन प्रणालीवरील अर्ज | |
| २ | १० वी गुणपत्रक | |
| ३ | १२ वी गुणपत्रक | |
| ४ | मार्च २०२६ पर्यंत वैध असणारा उत्पन्नाचा दाखला | |
| ५ | जातीचा दाखला | |
| ६ | जात वैधता प्रमाणपत्र | |
| ७ | रहिवासी दाखला | |
| ८ | मागील वर्षीचे (सन २०२४-२५ )गुणपत्रक/महाविदयालयाचे लेखी पत्र | |
| ९ | सन २०२५-२६ चे बोनाफाईड प्रमाणपत्र/प्रवेशाची पावती | |
| १० | सन २०२५-२६ ची महाविदयालयाची उपस्थिती | |
| ११ | विदयार्थ्याचे कॅप राऊंड लेटर | |
| १२ | शाळा सोडल्याचा दाखला | |
| १३ | विदयार्थी स्थानिक रहिवासी नसल्याचे प्रमाणपत्र | |
| १४ | विदयार्थी शासकीय वसतीगृहात राहत नसल्याचे प्रमाणपत्र | |
| १५ | विदयार्थ्याचा चालू वर्षीचा भाडे करारनामा/वसतीगृह प्रमाणपत्र | |
| १६ | भाडे पावती/वसतीगृह फी भरल्याची पावती | |
| १७ | गॅप सर्टिफीकेट लागू असल्यास | |
| १८ | विदयार्थ्याचे आधार कार्ड | |
| १९ | विदयार्थी बँक पासबुक | |
| २० | आधार व बँक लिंक केल्याचा पुरावा | |

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**सहायक संचालक, इतरमागास बहुजन कल्याण सातारा यांचे कार्यालय**
**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा ४१५००३**
**मोबाईल क्र. (०२१६२) २९५१००** **E mail: adobcsatara@gmail.com**

जा.क्र. ससंइमाबकसा/स्वयंम योजना/ ऑफलाईन प्रवेश /२०२६-२७/ 1817 दिनांक:- २३/०९/२०२६

**प्रति,**
प्राचार्य,
कनिष्ठ/वरिष्ठ/अनुदानित/विना अनुदानित,
तांत्रिक/औषधनिर्माण/नर्सिंग/वैदयक/कृषी इ. महाविदयालये,
जिल्हा सातारा

विषय :- धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेकरीता ऑफलाईन अर्ज करण्याकरीताचे प्रवेशाचे वेळापत्रक महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करणेबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग कल्याण, विभाग क्रमांक.धवगृ-२०१९/ प्र.क्र.१२६/मावक दिनांक ०६ सप्टेंबर २०१९
२. मा. अप्पर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ११६/योजना-१ दि. १७.०९.२०२६

उपरोक्त विषयान्वये अग्रेषीत करण्यात येते की, इतर मागास बहुजन कल्याण, विभागाकडून राज्यातील महानगर पालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालय / तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश घेणाऱ्या व वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या "धनगर" समाजातील विद्यार्थी निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी "पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना" सुरू करण्यात आलेली आहे.

सदर योजनेंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये लाभ घेऊ इच्छिणाऱ्या इयत्ता १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये (व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम) महाविद्यालीन शिक्षण घेणाऱ्या प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष,तृतीय वर्ष व चतुर्थ वर्षाकरीता **https://hmasnew.mahait.org** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे विदयार्थ्यांना अर्ज भरता येत नाहीत.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ०३ अन्वये ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक अडचणींचा विदयार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होऊ नये तसेच पात्र विदयार्थी केवळ तांत्रिक कारणामुळे योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी सदर योजनांकरीता ऑनलाईन प्रक्रीया सुरळीत होईपर्यंत विदयार्थ्यांना ऑफलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

पात्र विदयार्थी लाभापासून वंचित राहू नयेत याकरीता अर्ज भरणेची प्रक्रिया सुरु झालेली असून सदर योजनेंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये अर्ज करणेकरीता **दि. ३०.०९.२०२६** पर्यंतची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी सातारा तालुका/शहरातील महाविदयालयांमध्ये प्रथम वर्षात/ डायरेक्ट द्वितीय वर्षात प्रवेशित असणाऱ्या सर्व विदयार्थ्यांनी प्रथम शासकीय वसतीगृह या योजनेकरीता ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे. वसतीगृहातील रिक्त जागा भरल्यानंतर वसतीगृहापासून वंचित असणाऱ्या विदयार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ मंजूर केला जाईल याची सातारा शहारातील सर्व महाविदयालये तसेच विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच सातारा तालुका वगळता इतर तालुक्यातील विदयार्थ्यांनी वसतीगृहाकरीता अर्ज न करता थेट पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना या योजनेकरीता अर्ज करावा याची नोंद घ्यावी.

तरी पात्र विदयार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेणेकरीता प्रोत्साहन मिळणेकामी सदर योजनेचा प्रचार व प्रसार करावा. तसेच आपले महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रवेश वेळापत्राकाविषयीची सूचना दर्शनी बाजूस लावण्यात यावी,जेणेकरून तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल व कोणताही विद्यार्थी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**सोबत — ऑफलाईन अर्जाची प्रत.**

**(सुजीत बर्गे)**
**सहायक संचालक,**
**इतर मागास बहुजन कल्याण, सातारा.**

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

१. मा. संचालक, इतर मागस बहुजन कल्याण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागस बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, पुणे.